MHRT100000082026	प्रकरण दाखल तारीख	०२/०१/२०२६
	प्रकरण नोंदल्याची तारीख	०२/०१/२०२६
	निकाल दिनांक	२८/०५/२०२६
	कालावधी	वर्षे महीने दिवस ०० ०४ २६

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परीच्छेद (I))
राजापूर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात
(पिठासिन अधिकारी - श्रीमती एस. एस. हाके)

संक्षीप्त फौजदारी खटला क्र.०५/२०२६	**निशाणी क्र.०७ लगत**
खटला क्रमांक	संक्षिप्त फौजदारी खटला क्र.०५/२०२६
गुन्हा रजिस्टर क्रमांक व पोलिस ठाणे अथवा राज्य उत्पादन शुल्क	गु.र.क्र.२४६/२०२५, राज्य उत्पादन शुल्क-रत्नागिरी विभाग.
अभियोग पक्ष	महाराष्ट्र शासनतर्फे राज्य उत्पादन शुल्क-रत्नागिरी विभाग.
प्रतिनिधीत्व	सरकारी अभियोक्ता श्री. बी. एस. सुपेकर.
विरुध्द	
आरोपी	**समिता सुभाष भाटकर** वय – ६० वर्षे, धंदा - शेती, रा.माडबन वरीलवाडा, घर नं.४०, ता.राजापूर, जि. रत्नागिरी.
प्रतिनिधीत्व	विद्वान विधीज्ञ श्रीमती डी. ए. वस्ता.

भाग ब

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(II))**

गुन्हयाची तारीख	१९/११/२०२५
फिर्यांद पोलिस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख	१९/११/२०२५
दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख	०२/०१/२०२६
आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख	२७/०३/२०२६
पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख	०२/०५/२०२६
निकालाची तारीख	२८/०५/२०२६

जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख	संबंधीत नाही

आरोपी क्र.	आरोपीचे नाव	अटकेची तारीख	जामीनावर सोडलेची तारीख	दोषारोप ठेवलेले गुन्हे	निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली	दिलेली शिक्षा	फौ.प्र.सं. कलम ४२८ संपरिक्षेचे दरम्याने निरुध्द केलेल्या कालावधी
१	समिता सुभाष भाटकर	आरोपीस भा.ना.सु. सं.कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली.	२७/०३/ २०२६	महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई)	आरोपीस निर्दोष मुक्त केले.	लागू नाही.	--------

भाग क

(फौजदारी नियमावली प्रकरण परीच्छेद ४४ **(III))**

साक्षीदारांची यादी

अ. सरकारी साक्षीदारांची यादी

साक्षीदार क्रमांक	नाव	(पुराव्याचे स्वरुप) साक्षीदाराची भुमीका
सा. क्र.१	राजन गजानन कांबळे	पंच

ब. बचावाचे साक्षीदार - निरंक

क. अभियोगपक्षाच्या / बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

अभियोगपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी

वर्णन	निशाण
पंचनाम्यावरील साक्षीदाराची सही	०९

बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी - निरंक

मुद्देमाल

मुद्देमाल वस्तू क्र.	वर्णन
१.	सुमारे ३५ लि. मापाचे एक प्लॅस्टीक कॅन पूर्णपणे गावठी हातभट्टी दारुने भरलेले त्याची दारुसह अं.किं.रु.३६५०/-.
२.	सुमारे १० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये अं.०८ लि. गावठी हातभट्टी दारु तिची दारु व कॅनसह अं.किं.रु.९००/-.
३.	चार काचेची रिकामी दारुवासाची ग्लासे त्यांची अं.किं.रु.४०/-.

टिप- मुद्देमाल न्यायालयात जमा नाही.

न्यायनिर्णय
(घोषणा दिनांक २८/०५/२०२६)

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे-

०१. दिनांक १९/११/२०२५ रोजी माडबन वरीलवाडा येथील घर नं.४० चे मागील बाजूस, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे जावून दारुबंदी गुन्हयाअंतर्गत छापा टाकला असता सदर ठिकाणी आरोपी ही स्वतःचे ताबे कब्जात सुमारे ३५ लि. मापाचे एक प्लॅस्टीक कॅन पूर्णपणे गावठी हातभट्टी दारुने भरलेले, सुमारे १० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये अं.०८ लि. गावठी हातभट्टी दारु व चार काचेची रिकामी दारुवासाची ग्लासे असा एकूण रक्कम रुपये ४,५९०/- किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीरपणे आरोपीने तिच्या कब्जात बाळगला व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोगपक्षाचे कथन आहे. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा दोषारोप आरोपीला तिचे भाषेत वाचुन व समजावुन सांगितला असता, आरोपीने गुन्हा निशाण क्र.०७ वर नाकबुल केला व खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्र.१ राजन गजानन कांबळे या साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

०२. आरोपी विरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदयानुसार खटला चालविण्यात आला. आरोपीला गुन्हयाचे विवरण वाचून दाखविले असता आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे निशाण क्र.०७ लगत येथे कथन केले. त्यावरुन प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

०३. अभियोगपक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष तपासून पाहिली असता, आरोपी विरुध्द पुराव्यामध्ये कोणताही गुंतवणारा पुरावा न आल्याने आरोपीचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार जबाब नोंदविण्याची आवश्यकता भासली नाही.

०४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. उपरोक्त विवेचनावरुन म्हणजेच अभियोगपक्षाने सादर केलेल्या विवेचनावरुन माझ्या समोर खाली नमुद मुद्दे उपस्थित होतात व त्या मुद्दयांचे निष्कर्ष कारणांसहीत मी पुढीलप्रमाणे नोंदविले आहे.

अ.क्र.	**मुद्दे**		**<u>निष्कर्ष</u>**
१	दिनांक १९/११/२०२५ रोजी माडबन वरीलवाडा येथील घर नं.४० चे मागील बाजूस, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे आरोपी ही स्वतःचे ताबे कब्जात सुमारे ३५ लि. मापाचे एक प्लॅस्टीक कॅन पूर्णपणे गावठी हातभट्टी दारुने भरलेले, सुमारे १० लि. मापाच्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये अं.०८ लि. गावठी हातभट्टी दारु व चार काचेची रिकामी दारुवासाची ग्लासे असा एकूण रक्कम रुपये ४,५९०/- किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीरपणे कब्जात बाळगताना मिळून आली त्यामुळे तिने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केलेला आहे असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय?		**..... नकारार्थी**
२	काय आदेश?		**आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.**

कारणमीमांसा

मुद्दा क्रमांक १ करीता

०५. प्रस्तुतच्या खटल्यातील पंच साक्षीदार क्र.१ राजन गजानन कांबळे याने त्याच्या साक्षीपुराव्यात असे कथन केले आहे की, दि.१९/११/२०२५ रोजी त्याला कोणीही कोठेही बोलविले नव्हते, त्यांच्यासमक्ष कोणतेही लिखाणकाम झालेले नाही अगर कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नव्हता. तसेच त्यांच्या मजकूराबाबत त्याला काहिही माहिती नसल्याचे त्याने कथन केले आहे.

०६. एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता असे निर्दशनास येते की, साक्षीदार क्र.१ राजन गजानन कांबळे याने अभियोगपक्षाला सहकार्य होईल असा कोणताही पुरावा त्याने त्याच्या साक्षीदरम्याने कथन केलेला नाही. तसेच सदर केसमधील फिर्यादी, तपासी अधिकारी व दुसरे पंच साक्षीदार यांच्या साक्षी अभियोगपक्षाला बऱ्याच संधी देवूनही नोंदविण्यात आलेल्या नाहीत. त्यामूळे सदर घटनेला दुजोरा देणारा एकही स्वतंत्र साक्षीदार नाही. तसेच तपासी अधिकारी यांनी खरोखरच छापा टाकला व दोन पंचांच्यासमक्ष पंचनामा केला याबाबत संशय निर्माण होतो. त्याचप्रमाणे घटनास्थळ हे तेच आहे असे दर्शविण्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तरी आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभट्टीची दारु जप्त केल्याबाबत कोणताही विश्वसनिय पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे सदर खटल्यात आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील रसायन हे गावठी हातभट्टीची दारु होती असे विनासंशय शाबीत होत नाही. त्याचप्रमाणे रासायनिक परिक्षणाकरीता घेतलेले सॅम्पल स्वच्छ शिशित काढले होते किंवा कसे याबाबत उलगडा होत नाही. त्यामुळे आरोपीने आपल्याजवळ गावठी हातभट्टीची दारु बाळगली, हे सिध्द होत नाही. उपरोक्त कारणामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकरार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी पुढील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. आरोपी **समिता सुभाष भाटकर** हिस कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा मधून कलम २५५(१) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार निर्दोष सोडण्यात येत आहे.

२ आरोपीचे जामीन विसर्जीत करण्यात येत आहे.

३ आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार रु.१५,०००/- इतक्या रक्कमेचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन बंधपत्र पुर्वीचे पुढे चालू ठेवण्यात येते.

४ सदर खटल्यातील दारुचा जप्त मुद्देमाल अपिल कालावधीनंतर कायदयाप्रमाणे नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2026.05.28 17:24:08 +0530

दिनांक - २८-०५-२०२६ **(एस. एस. हाके)**
ठिकाण- राजापूर **न्यादंडाधिकारी प्रथम वर्ग,**
राजापूर.

CERTIFICATE

"Judgment/Order in :-Summary Criminal Case No.05/2026

I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.

Name of Stenographer:- M. N. Patil

Court Name :- Civil & Criminal Court, Rajapur.

Date of Decision :- 28-05-2026

Judgment signed by P.O. on :- 28-05-2026.

Judgment uploaded on :- 28-05-2026.